# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## प्रादेशिक बातमीपत्र
## सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.10.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

- रबी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्यास केंद्रीय मंत्रीमंडळाची मान्यता; केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यामध्ये वाढ
- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिवाळीच्या काळात दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंवर निवडणूक आयोगाचं बारीक लक्ष
- आपल्या सव्वा दोन वर्षांच्या कार्यकाळाचा महायुतीकडून लेखाजोखा तर महाविकास आघाडीचं सरकारवर टीकास्त्र, आणि
- आगळ्या चित्रकथी महोत्सवाला सिंधुदुर्गमध्ये सुरवात

**केंद्रीय मंत्रीमंडळ**

रबी पिकांच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्यास केंद्रीय मंत्रीमंडळानं काल मान्यता दिली. ही वाढ 2025 - 26 या पणन हंगामासाठी आहे. केंद्रीय मंत्रीमंडळाची बैठक काल नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बैठकीत घेतलेल्या निर्णयांची माहिती वार्ताहर परिषदेत दिली.
मोहरीच्या किमतीत सर्वाधिक 300 रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली असून मसूर डाळींच्या किमतींत 275 रुपयांची वाढ करण्यात आली आहे. हरभरा डाळीच्या किमतीत 210 तर गव्हाच्या एमएसपी मध्ये दीडशे रुपये प्रति क्विंटल वाढ करण्यात आली आहे.

केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यामध्ये 3 टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळानं घेतला आहे. या निर्णयाचा लाभ 49 लाख कर्मचारी आणि सुमारे 64 लाख निवृत्तीवेतन धारकांना होणार आहे. या निर्णयामुळे सरकारी तिजोरीतून दर वर्षी 9 हजार 448 कोटी रुपये खर्च होणार आहेत.

**निवडणूक आयोग**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर दिवाळीच्या काळात राजकीय पक्ष किंवा उमेदवारांकडून दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंवर निवडणूक आयोगाचं बारीक लक्ष असणार आहे. सर्वसामान्य नागरिक आपल्या तक्रारी C-VIGIL ॲपवर नोंदवू शकतात, अशी माहिती अतिरीक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर राज्यात जर काही शासन आदेश जारी झाले असतील किंवा जाहिराती प्रसिद्ध झाल्या असतील तर त्याचीही चौकशी केली जाईल, असं कुलकर्णी यांनी संगीतलं.

निवडणुकीत उमेदवाराला कमाल 40 लाख रुपये खर्च करता येणार आहे. उमेदवारी अर्ज भरल्यानंतर खर्चाची मोजणी सुरू होईल पण अर्ज भरण्यापूर्वी खरेदी केलेल्या प्रचारसाहित्याचा खर्च यात धरला जाईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिली.

ज्या मतदारांना आपली नावं मतदार यादीत नोंदवायची आहेत, त्यांनी ती 19 ऑक्टोबर पर्यन्त नोंदवावीत असं चोक्कलिंगम यांनी सांगितलं. अधिसूचना जारी झाल्यानंतर नावनोंदणी करता येणार नाही.

**जिल्हे-तयारी**

राज्य विधानसभा निवडणूकीची घोषणा झाल्यानंतर जिल्हयाजिल्ह्यात प्रशासन निवडणूकीसाठी सज्ज होत आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये निवडणूक तयारी आढावा बैठका घेतल्या जात आहेत. निवडणूक तथा जिल्हाधिकाऱ्यांनी राजकीय पक्षांना सहकार्य करण्याचं आवाहन केलं आहे. सर्वांना बॅनर, फलक तातडीनं काढून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शासकीय कार्यालयं, सार्वजनिक ठिकाणं, इथं धरणं आंदोलन, मोर्चा, निदर्शनं, उपोषण करण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. सर्व जिल्हे आपापल्या सीमांवर लक्ष ठेवून आहेत. यवतमाळ जिल्ह्यात आंतरराज्य तेलंगण सीमेवर तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. गडचिरोली जिल्ह्यात 362 मतदान केंद्रं संवेदनशील आहेत. निवडणुकीसाठी 17 हजार सुरक्षा रक्षकांची फौज तैनात राहणार आहे. दुर्गम भागात ईव्हीएम आणि कर्मचाऱ्यांची ने-आण करण्यासाठी शासनाकडे 5 हेलिकॉप्टरची मागणी करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेमध्ये माध्यम कक्षाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. निवडणूक प्रक्रिया पार पाडताना माध्यम कक्ष समन्वय अधिकाऱ्यांनी निरपेक्ष आणि पारदर्शकपणे काम करावं, असे निर्देश पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले. माध्यम कक्ष समन्वय अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते काल बोलत होते.

जनमानसामध्ये प्रशासनाची सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्याचं काम माध्यम कक्षामार्फत केलं जातं, असं दिवसे म्हणाले.
या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**महायुती**
आमची सव्वा दोन वर्षातली विकासकामं हाच आमचा चेहरा असून समाजाच्या सर्व घटकांसाठी महायुती सरकारनं काम केलं आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत याची पोचपोवती जनता दिल्याशिवाय राहणार नाही आणि महायुती सरकार पुन्हा एकदा बहुमतानं निवडून येईल असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत व्यक्त केला. महायुतीनं केलेल्या कामांचं प्रगतीपुस्तक प्रकाशित केलं, त्यावेळी शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, खासदार सुनिल तटकरे आदी यावेळी उपस्थित होते. राज्य सरकारच्या दोन वर्षांचा कामांचा लेखाजोखा या वेळी महायुतीकडून मांडण्यात आला.

**विरोधक**
तर, महायुतीचे सर्व दावे खोटे आहेत, असा आरोप कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. महाविकास आघाडीचं सरकार आल्यानंतर मुंबईमधील अदानी समूहाला दिलेले भूखंड आम्ही काढून घेऊ, असं शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं.सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीनं व्याहाड ते मोवाड "लढा माझ्या शेतकऱ्याचा" यात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली. भाजपा प्रणित सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे राज्यातील जनता हैराण झाली आहे, अशी टीका त्यांनी यावेळी केली.

**चित्रकथी**
सिंधुदुर्ग जिल्ह्यात भारत सरकारच्या सांस्कृतिक विभागाच्या सहयोगानं आणि दायती लोककला संवर्धन अकादमी पिंगुळी यांच्या आयोजनातून आज आणि उद्या ठाकरवाडी म्युझियममध्ये चित्रकथी रामायण महोत्सव 2024 चं आयोजन करण्यात आल आहे. चित्रकथी या आगळ्या कलाप्रकाराविषयी आणि या महोत्सवाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

चित्रकथी या कला प्रकाराला घेऊन आयोजित होणारा महोत्सव हा इतिहासातला पहिलाच महोत्सव असून हा महोत्सव दोन दिवस चालणार आहे. नामवंत चित्रकथी कलाकार या महोत्सवात सहभागी होणार आहेत. तसच रामायण आणि चित्रकथी परंपरा यावर चर्चासत्र सुद्धा होणार आहे. ठाकर आदिवासी कलाकारांची चारशे वर्षांची परंपरा असलेली ही चित्रकथी. यामध्ये चित्राच्या माध्यमातून ठरवून दिलेल्या मंदिरात दसऱ्याच्या कालावधीत दहा दिवस एक कथा चित्राच्या माध्यमातून सादर केली जाते. टाळ, तंबोरा, डमरू या वाद्यांची साथसोबत संपूर्ण रात्र असते. अशा दहा रात्री हे कथाकथन चालतं. ही कला सादर करणाऱ्या कलाकारांना बावलेकर म्हटलं जातं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात हेरगिरीसाठी सुद्धा या चित्रकथीचा वापर केला जायचा. पहिल्यांदाच होत असलेल्या या महोत्सवात वैशिष्टपूर्ण अशी चित्रकथी परंपरा, पाहायला मिळणार आहे. या महोत्सवात 14 ते 15 चित्रकथी सादर करणारे कलाकार सहभागी होणार असून कोकणातील ही पारंपरिक अशी पुरातन कला रसिकांसमोर सादर करणार आहेत.

**तुळजाभवानी**

तुळजाभवानी देवीच्या मंदिर जीर्णोध्दार कामाचा शुभारंभ काल करण्यात आला. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची काळजी घेवून मंदिराच्या जीर्णोध्दार कामाचं नियोजन करण्यात आलं आहे. समितीच्या निधीमधून आणि पुरातत्व खात्याच्या निगराणीखाली हे काम होणार आहे.

**दहावी,बारावी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या फेब्रुवारी मार्च 2025 मध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षांचं वेळापत्रक अजून जाहीर झालं नसल्याचं स्पष्टीकरण मंडळानं एका पत्रकाद्वारे दिलं आहे. परीक्षांच्या तारखा प्रकाशित झाल्याची बातमी काही ठिकाणी दिली असल्याचं निदर्शनास आल्यामुळं मंडळानं हा खुलासा केला आहे.

**पैसे-नजर**

राज्यातल्या विधानसभा निवडणूकीत पैशांचा गैरवापर होऊ नये यासाठी प्राप्तीकर विभाग करडी नजर ठेवून आहे. कोठेही पैशाचा गैरवापर होत असल्यास त्याबद्दल त्वरीत कळवावं, असं आवाहन पुणे प्राप्तीकर विभागानं केलं आहे. निवडणूकीवर होणाऱ्या

खर्चावरही देखरेख ठेवण्यात येणार आहे. निवडणूक कालावधीत काळ्या पैशांच्या व्यवहारावर बारीक नजर ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती नागपूरचे प्राप्तीकर उप-संचालक अनिल खडसे यांनी दिली. याबाबतची माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख गुप्त ठेवण्यात येईल, असंही खडसे यांनी सांगितलं.

**पैसे**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात फोंडाघाट नाक्यावर काल पोलिसांनी कोल्हापूरकडे जाणाऱ्या कारमधील 10 लाखांहून अधिक रोख रक्कम जप्त केली. प्राथमिक माहितीनुसार ही रक्कम कोल्हापूरमधल्या एका व्यापाऱ्याची असल्याचं निदर्शनास आलं आहे.

**बॉम्बची धमकी**

विमानात बॉम्ब ठेवल्याची धमकी देण्याच्या आरोपावरून मुंबई पोलिसानी काल एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतलं. या मुलानं दुसऱ्या एका व्यक्तीस अडकवण्यासाठी हा प्रकार केल्याची माहिती पोलिसांनी दिली. या धमकीच्या प्रकारामुळे 14 ऑक्टोबर रोजी 4 विमानांचं वेळापत्रक कोलमडलं होतं.

**आग**

मुंबईतल्या अंधेरीच्या लोखंडवाला संकुलातल्या एका रहिवासी इमारतीला काल लागलेल्या आगीत तिघांचा मृत्यू झाला. इमारतीच्या दहाव्या मजल्याला लागलेल्या या आगीचं कारण अजून स्पष्ट झालेलं नाही.

**क्रिकेट**

भारत-न्यूझीलंड क्रिकेट कसोटीचा पहिला दिवस काल बंगळुरु इथं पावसामुळं वाहून गेला. दुसऱ्या दिवशी आज नाणेफेकीपासून सुरुवात होणं अपेक्षित आहे. याआधी भारतानं बांग्लादेशविरुद्धची मालिका 2-0 अशी जिंकली आहे तर न्यूझीलंड श्रीलंकेविरुद्धची मालिका हरला आहे. विश्व कसोटीच्या वर्तमान क्रमवारीत भारत सध्या अग्रस्थानी तर न्यूझीलंड सहाव्या स्थानी आहे.

**पाऊस**

रत्नागिरीला परतीच्या पावसानं कालही झोडपून काढलं. कापणीला आलेली भातशेती कोसळणाऱ्या पावसामुळं आडवी झाली आहे. सांगली जिल्ह्याच्या अनेक तालुक्यांमध्ये काल रात्री मुसळधार पाऊस पडला.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**